## दस्त नोंदणी न केलेल्या प्रकरणांमध्ये,ई- पेमेट पध्दतीने भरलेल्या नोंदणी फी चा परतावा

## Refund of Registration fee paid by e-payment in case of Non Registration of document

### प्रक्रीया (Process)

### अ. पक्षकाराकडून करावयाची प्रक्रीया -

1. दस्त नोंदणी केलेली नाही किंवा करावयाची नसल्यास, संबधित नोदंणी फी भरणारे पक्षकार ज्या दुय्यम निबंधक कार्यालयाचे नावाने अशी नोदंणी फी शासनास भरलेली आहे, त्या दुय्यम निबंधकास परतावा मिळणेसाठी अर्ज करणे.
2. रुपये 5/- चा चिकट न्यायालयीन मुद्रांक (कोर्ट फी लेबल)चिकटविणे

### ब. दुय्यम निबंधक कार्यालयाकडून करावयाची प्रक्रीया -

1. असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, दुय्यम निबंधक अर्जाचे अनुषंगाने दस्ताची छाननी करेल
2. अर्जातील मुददयामध्ये तथ्यांश असल्याचे निदर्शनास आल्यास, परतावा मिळणेसाठी तसा प्रस्ताव सह जिल्हा निबंधक कार्यालयात सादर करेल.

### क. सह जिल्हा निबंधक कार्यालयाकडून करावयाची प्रक्रीया -

1. प्राप्त प्रस्ताव, अर्जदाराचा अर्ज व दस्ताची प्रतीचे अवलोकन करून अर्जातील मुददयामध्ये तथ्यांश असल्याचे निदर्शनास आल्यास,परतावा मंजूर करणे

यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी ‹दस्त नोंदणी‹ इतर काही महत्वाच्या बाबी ‹नोदंणी फी परतावा पहावे.